**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय**
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

**विषय**:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या 35 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/112 /सन 2025-26
फोर्ट, मुंबई 400001 दिनांक: 22.9.2025

**प्रति,**

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
4. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
5. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईंदर / वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल / भिवंडी-निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
6. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
7. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
8. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
9. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
10. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
11. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA)
12. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
13. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
14. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
15. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
16. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
17. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
18. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
19. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप.
20. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
21. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
22. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
23. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)

**संदर्भ** :- या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-1/ल.ले/79/सन 2025-26 दि. 12.08.2025.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **35 वी** बैठक **सोमवार, दि.** 18.08.2025 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

**(मधुमिथा एस.)**
**सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

# ३५ वी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीची
# सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त
## विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचे कार्यालय, सी.बी.डी, बेलापूर, मुंबई.

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३५ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या बैठकीस सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश:व व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. विजय सुर्यवंशी, भा.प्र.से. | मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| 2. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | कांदळन कक्ष, मुंबई |
| 3. | श्री. एन. आर. प्रवीण | मुख्य वनसंरक्षक, (प्रा.), ठाणे | मुख्य वनसंरक्षक, (प्रा.), ठाणे |
| 4. | श्रीमती मधुमिता एस. भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 5. | श्री. प्रदीप रा.तावरे | सहा.अधीक्षक, क्र. 1 | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 6. | श्री. घनशाम नवांगुळ | EE पर्यावरण विभाग KDMC | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| 7. | श्री. विजय चौधरी | Deputy Planner, MIDC | MIDC Mahape / Panvel / Thane |
| 8. | श्री. रा. अ. सारंग | उप भूमी व मिळकत व्यवस्था | MMRDA |
| 9. | श्री. मधुकर बोडके | उप महानगरपालिका आयुक्त पर्यावरण | TMC |
| 10. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी | TMC |
| 11. | श्रीमती विभावरी टुकणे | सहयोगी नियोजक (पर्यावरण) | सिडको |
| 12. | श्री. जयेश इ. वैष्णवाणी | Deputy Support of Salt | Deputy Salt Commissioner |
| 13. | श्रीमती सुवर्णा जाधव | Field Officer MPC | B Thane |
| 14. | श्री. बासिन अली सय्यद | ACP | मुंबई |
| 15. | श्री. एस. एम. सोनवणे | A.P.I. | ठाणे ग्रामीण SP |
| 16. | श्री. राहूल माटे | A.P.I. | MBVV Police Commissioner |
| 17. | श्री. तानाजी नरनावर | P. I. Additional Charge DySP (Home) | पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड अलिबाग |
| 18 | श्री. दिपक हरवेद | आरेखक | सिडको |
| | **व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य** | | |
| 19 | जिल्हाधिकारी, रत्नागिरी | जिल्हाधिकारी, रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी कार्यालय |
| 20 | Collector Mumbai Suburban | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर कार्यालय |
| 21 | Collector Palghar | जिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी पालघर कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | Collector Sindhudurg | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालय |
| 23 | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग-उत्तर कोकण |
| 24 | श्रीमती कांचन पवार | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग-दक्षिण कोकण अलिबाग |
| 25 | Sub-Divisional officer, Thane | - | - |
| 26 | Info BEAG | Info BEAG | - |
| 27 | Pratap Jagtap | - | - |
| 28 | Rahul Dhas | - | - |
| 29 | Rahul Koli | - | - |
| 30 | DMC Zone | - | - |
| 31 | Sindhudurg Control | - | - |
| 32 | SDO Panvel | - | - |
| 33 | SRO Navi Mumbai I | - | - |
| 34 | DMC Zone-I | DMC Zone-I | - |
| 35 | Anant Jawadwar | - | - |
| 36 | Aarti Chavan | - | - |
| 37 | Bhuvan Shwari | - | - |
| 38 | Regional Office MIDC | - | - |
| 39 | SDO Panvel | - | - |
| 40 | Shripad Kulkarni | - | - |
| 41 | Regional office MIDC | - | - |
| 42 | Tahasildar Mira bhayander | - | - |
| 43 | Tahasildar Thane | - | - |
| 44 | Vasai SDO | - | - |
| 45 | Vikram Kadam | - | - |
| 46 | Zameer Mujawar | - | - |
| 47 | Radhik Padke | - | - |

व्हि.सी. मधील उपस्थित काही सदस्यांचे नाम / पदनामाचा बोध होत नसल्यामुळे फक्त नावांची नोंद केलेली आहे.

| अ.क्र | मुद्दा व विषय | झालेली चर्चा घेण्यात आलेला निर्णय/ सूचना | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | • **समितीचे मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना महसूल विभाग, वन विभाग आणि संबंधित विभाग (उदा. संबंधित महानगरपालिका, सिडको, MIDC, MMRDA व इतर) यांच्याशी समन्वय साधून आवश्यक स्थळ पाहणी करुन खालीलप्रमाणे पूर्वी शिल्लक असलेले कांदळवन क्षेत्र व MRSAC 2005 & IIST 2018 यांचेकडील कांदळवन दर्शक नकाशानुसार व जागेच्या सध्यस्थितीनुसार नव्याने निदर्शनास आलेलले एकूण 10487.78 हे. वाढीव कांदळवन क्षेत्र वन विभागाला हस्तांतरण करण्याकरीता आवश्यक कार्यवाही तात्काळ सुरु करुन हस्तांतरणाची कार्यवाही मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवमान (Contempt) होणार नाही या दृष्टीने दि.30 सप्टेंबर 2025 पर्यंत प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.** | सर्व संबंधित जिल्हाधिकारी महानगरपालिक, इतर शासकीय यंत्रणा व कांदळवन कक्ष, मुंबई. |

| अ. क्र. | जिल्हा | वन विभागाला हस्तांतरित झालेले एकूण कांदळवन क्षेत्र (हे.) | दि. 09.10.2023 रोजी वन विभागाला हस्तांतरित करण्यासाठी शिल्लक असलेले कांदळवन क्षेत्र (हे.) | रकाना 4 पैकी अजूनही वन विभागाला हस्तांतरित न झालेले क्षेत्र (हे.) | MRSAC 2005 यांचेकडील कांदळवन दर्शक नकाशानुसार व जागेच्या सद्यस्थितीनुसार नव्याने निदर्शनास आलेले इतर शासकीय विभागाकडील कांदळवन क्षेत्र (हे.) | वन विभागाला हस्तांतरित करण्यासाठी शिल्लक असलेले कांदळवन क्षेत्र एकूण एकंदर (रकाना 5+6) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | मुंबई शहर | 253.00 | 23.65 | 23.65 | 44.85 | 68.50 |
| 2 | मुंबई उपनगर | 4060.32 | 0 | 0 | 275.13 | 275.13 |
| 3 | ठाणे | 3564.51 | 2.69 | 2.69 | 445.03 | 447.72 |
| 4 | पालघर | 4153.22 | 1277.58 | 41.54 | 4670.89 | 4712.43 |
| 5 | रत्नागिरी | 2587.22 | 579.01 | 0 | 338.95 | 338.95 |
| 6 | सिंधुदुर्ग | 426.32 | 58.10 | 5.49 | 157.79 | 163.28 |
| 7 | रायगड | 10035.82 | 70.33 | 70.33 | 4411.44 | 4481.77 |
| एकूण | | 25080.41 | 2011.36 | 143.70 | 10344.08 | 10487.78 |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | जिल्हास्तरीय समितींच्या बैठकीबाबत/ | • मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना **जिल्हा व तालुका स्तरीय** कांदळवन समितीच्या नियमीत बैठका होत नसल्याचे | सर्व संबंधित जिल्हाधिकारी, |

| | | | |
|---|---|---|---|
| | इतिवृत्तांबाबतचा आढावा. | निदर्शनास आल्याने प्राधान्याने या बैठका घेण्याच्या सूचना दिल्या.<br>• समितीने जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये कांदळवन विभागातील **मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व पालघर या जिल्हयांकरीता कार्यरत असलेले विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग व सहायक वनसंरक्षक, उत्तर कोकण व रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग याकरीता कार्यरत असलेले विभागीय वन अधिकारी व सहायक वनसंरक्षक, दक्षिण कोकण यांच्याशी समन्वय साधण्याच्या सूचना दिल्या.**<br>• तसेच सदर बैठकीमध्ये कांदळवन क्षेत्राच्या प्रलंबित ऑफ लाईन व ऑन लाईन म्हणजेच Mangrove Surkhsha App च्या तक्रारींवर बैठका घेण्याच्या व त्यांचे इतिवृत्त विभागीय आयुक्त स्तरावरील समितीचे **सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई** यांचेकडे दि.30 सप्टेंबर 2025 पूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | विभागीय वन अधिकारी व सहायक वनसंरक्षक, कांदळवन विभाग, उत्तर कोकण व दक्षिण कोकण |
| ३ | समितींकडील जुन्या जिल्हा निहाय एकूण 55 प्रलंबित ऑफलाईन तक्रारींबाबत आढावा. | • समितीचे सदस्य सचिवयांनी कांदळवन समितीच्या ऑफ लाईन 55 तक्रारींपैकी 50 तक्रारींचे अहवाल प्राप्त झाले असून काही तक्रारी ज्या तक्रारींवर उचित कार्यवाही झाली आहे, यामध्ये मुंबई उपनगर जिल्हयातील 5 (तक्रार क्रमांक- 118,196,202,216, 228), पालघर 2 (तक्रार क्रमांक- 265,266) व रायगड 3 (तक्रार क्रमांक-240,287,288) अशा एकूण 10 तक्रारी केलेल्या कार्यवाहीनुसार निकाली काढण्यासाठी योग्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर चर्चा होऊन मा. अध्यक्ष व इतर समितीचे सदस्यांसोबत सविस्तर झालेल्या चर्चेनुसार सदर 10 तक्रारी निकाली काढण्याचे निर्देश दिले. | सर्व जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **उर्वरित प्रलंबित तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत स्पष्टता दिसून येत नसल्याने सर्व जिल्हाधिकारी यांना तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात सदस्य सचिवांकडे सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या.** | |
| ४ | Mangorve Suraksha App वरील प्राप्त तक्रारींच्या स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित प्रारुपात ॲपवर अपलोड करणेबाबत आढावा. | • मा. अध्यक्ष यांनी जिल्हा निहाय कांदळवन तक्रारींबाबत आढावा घेतला.<br>• **त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना तात्काळ त्यांचे कार्यक्षेत्रातील Mangorve Suraksha App वरील तक्रारींवर नियमोचित कार्यवाही करुन तक्रारींचा निपटारा करण्याच्या सूचना दिल्या.** | सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांचे संबंधित उप विभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, उत्तर कोकण व दक्षिण कोकण कांदळवन विभाग |
| ५ | कांदळवन क्षेत्रामधील डेब्रिज / भराव हटविण्याबाबत आढावा. | • दिनांक 01.04.2025 रोजी मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई व संबंधित सदस्यांची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत कांदळवन क्षेत्रातील डेब्रिज/भरावाचे मोजमाप करण्यासाठी MAHAPREIT व ERÁF संस्थांच्या तांत्रिक सहाय्याने कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने कांदळवन कक्षाकडून MAHAPREIT संस्थेला रु. 10.85 लक्ष रक्कमेचा प्रकल्प दिला असून त्यातील पहिला हप्ता रु.5,42,800/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे | MAHAPREIT व BMC |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सांगितले.<br>• यासंदर्भात MAHAPREIT यांचेमार्फत श्री. ए. के. जैन, अध्यक्ष तथा मुख्य व्यवस्थापकीय संचालक, ERAF यांनी सध्या 3 प्रकल्पांमध्ये Environment Research Foundation (ERAF) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सोबत संयुक्तरित्या काम सुरू असून सध्यस्थितीत मुंबई महानगर प्रदेश (MMR) मधील कांदळवन क्षेत्रात अनुक्रमे 130 ठिकाणी डेब्रिज भराव असल्याची माहिती दिली.<br>• **त्या अनुषंगाने मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांनी MAHAPREIT यांना महानगरपालिका क्षेत्रात काम करताना कोणत्याही प्रकारे शासकीय अडचणी उद्भवल्यास कांदळवन कक्षाचे कार्यारंभ आदेश संबंधित यंत्रणांना दाखविण्याच्या व त्यानुसार सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या.**<br>• तसेच मा. श्री. ए. के. जैन, अध्यक्ष तथा मुख्य व्यवस्थापकीय संचालक, ERAF यांनी वरील नमूद प्रकल्पा संदर्भातील कामे **सप्टेंबर 2025 अखेर पर्यंत** पूर्ण करण्याचे नियोजिले आहे असे मा. अध्यक्षांना सांगितले. | |
| ६ | पोलीस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत सद्यस्थिती व त्या गुन्ह्यामध्ये शिक्षा झालेल्या प्रकरणांबाबत आढावा. | • मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग व मा. सह-अध्यक्ष यांनी कांदळवन संरक्षणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन पोलीस यंत्रणेमार्फत गुन्हे नोंदविले जातात त्यामध्ये किती गुन्ह्यांमध्ये शिक्षा झालेली आहे, याबाबत अहवाल पाठविण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सर्व जिल्हयांतील संबंधित सध्यस्थितीत पोलीस यंत्रणांकडून अहवाल प्राप्त झाले आहेत. | संबंधित पोलीस यंत्रणा व कांदळवन कक्ष, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • मा. अध्यक्ष यांनी पोलीस यंत्रणेने कांदळवन तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीबाबत एक तक्ता तयार करण्याच्या सूचना दिल्या. त्यामध्ये तक्रार दाखल दि. / तपासू पूरण झाल्याचा दि./ चार्जशीट झाल्याचा दि/ कोणत्या न्यायालयात प्रलंबित आहे./ सुनावणी सुरु झाली किंवा नाही. / तपासावर कधी पासून सुरु आहे याबाबतचा तक्रार निहाय तपशील घेण्याच्या सूचना दिल्या. | |
| | | • **तसेच सर्व जिल्हयातील संबंधित पोलीस आयुक्तालय, यांचेकडून तक्रारींच्या अनुषंगाने गुन्ह्यांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीकडे दि.30 सप्टेंबर 2025 पूर्वी सादर करावे सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी सर्व संबंधित पोलीस आयुक्तालय यांना दिल्या.** | **सर्व संबंधित पोलीस आयुक्तालय** |
| **७** | **आयत्या वेळेचे विषय** | | |
| **अ** | कांदळवन तक्रारी संबंधी तक्रार प्राप्त झाल्यावर करावयाच्या र्कावाहीबाबत. | • कांदळवन तक्रारी संबंधी तक्रार प्राप्त झाल्यावर <u>वेळेत स्थळ पाहणी होत नसल्याबाबत</u> समितीचे सदस्य यांनी श्री. स्टॅलिन डी यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी **सर्व जिल्हाधिकारी** यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासन निर्णय दि. 19 डिसेंबर 2018 अन्वये कांदळवन समितीकडे ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे प्रभावीपणे निवारण करणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत:-<br>1. **प्रत्येक तक्रारीवर संबंधित विभागांचे प्रतिनिधी (उदा.महसूल विभाग, वन विभाग व संबंधित विभागाचे प्रतिनिधी जसे की, BMC, सिडको, MMRDA ईत्यादी) यांच्या** उपस्थितीत **<u>48 तासांच्या आत स्थळ पाहणी</u>** करण्यात यावी.<br>2. स्थळ पाहणीदरम्यान GPS छायाचित्रे, व्हिडिओ रेकॉर्डिंग इत्यादी नोंदी करणे अनिवार्य आहे.<br>3. कांदळवनाची तोड किंवा ऱ्हास आढळल्यास तत्काळ गुन्हा नोंदवावा. गुन्हा नोंदवल्यानंतर 1 **महिन्याच्या** आत तपास पूर्ण | सर्व संबंधित जिल्हाधिकारी महानगरपालिका व कांदळवन कक्ष, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करून सर्व पुरावे व दोषारोपपत्र संबंधित अधिकाऱ्याकडे सुपूर्त करावे. तसेच, संबंधित आरोपींविरुद्ध प्राधान्याने कार्यवाही करून 2 **महिन्यांच्या** आत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करावे.<br>वरील कार्यवाही प्राथमिकतेने व नियमानुसार पार पाडावी, याची दक्षता घेण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | |
| ब | कांदळवन तक्रारी संबंधित प्रकरणांवर गुन्हा दाखल (FIR) झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत. | • समितीतील तक्रारी निकाली काढण्यासंदर्भात समितीचे सदस्य श्री. स्टॅलिन डी यांनी न्यायालयीन स्तरावर प्रलंबित असलेल्या तक्रारी संदर्भात, संबंधित प्रकरणांवर गुन्हा दाखल (FIR) झाल्यानंतर योग्य कायदेशीर कार्यवाही होणे अपेक्षित आहे. अन्यथा, आरोपींकडून MRTP व Trespass संबंधी कृती करुन त्यांची सुटका होत असून, त्यामुळे कांदळवन तोड प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे सांगितले.<br>• समितीचे सदस्य मा. श्री. स्टॅलिन डी. यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कांदळवन क्षेत्रात होणाऱ्या अनियमिततेस फौजदारी गुन्हा (Criminal Offence) समजून, अशा प्रकरणांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, खाजगी व बफर क्षेत्रांतील कांदळवन क्षेत्रांवर होणाऱ्या गुन्ह्यांसाठी पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 मधील कलम 15 अंतर्गत कारवाई केली जाते. परंतु सदर अधिनियम सध्या 'Decriminalised' झाल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात अडथळा येत असल्यामुळे याबाबत कायदा व न्याय विभागामार्फत आवश्यक कायदेशीर अभिप्राय प्राप्त करून घेण्याबाबत सांगितले. यावर मा. अध्यक्ष यांनी सहमती दर्शवून, आवश्यक मार्गदर्शन घेण्यास मा. सह-अध्यक्ष यांना निर्देश दिले. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी व कांदळवन कक्ष, मुंबई. |

Rama Rao

**(एस.व्ही. रामाराव, भा.व.से.)**
**सह अध्यक्ष**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती, तथा**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**( डॉ. विजय सुर्यवंशी, भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग**